REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 8 | ISSUE - 10 | JULY - 2019

# पिंपळे (ता. इंदापूर) गावचा इतिहास

प्रा. सुरेंद्र अर्जुन शिरसट
सहाय्यक प्राध्यापक, इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे,
कला महाविद्यालय, भिगवण, ता. इंदापूर, जि.पुणे.

## प्रस्तावना :




पिंपळे हे गाव भिगवण लगत असून इंदापूरच्या पूर्वेस सुमारे ४० किमीवर आहे. हे गाव येथील पद्मावती देवीच्या देवस्थानामुळे परिसरातप्रसिध्द आहे.बारामती भिगवण रस्त्यालगत गाव वसलेले असून मदनवाडी, शेटफळगढे, अकोले, पोंधवडी इत्यादी गावे भोवताली आहेत.पिंपळे हे गावाचे नाव पिंपळाची झाडे अधिक असल्याने पडले असावे अशी शक्यता वाटते.मोडी कादपत्रांतील उल्लेखानुसार देवस्थान पत्रकात महादेव देवस्थानाचा उल्लेख पिंपळेश्वर महादेव असा आहे[1]पिंपळेश्वर देवस्थान असलेले गाव म्हणून पिंपळे असा गावनामाचा संदर्भ असावा असे दिसते.

## धार्मिक बाबी :

गावात मारूती, लक्ष्मीआई, अंबाबाई, महादेव, पद्मावती ही देवस्थाने असून पद्मावती हे ग्रामदैवत आहे.[2]इ.स. १७३५ च्या मोडी लिपीतील देवस्थान पत्रकानुसार गावात श्री.भवानी पद्मावती, श्री. महादेव (पिंपळेश्वर), श्री. मारूती या देवस्थानांचा उल्लेख येतो.[3]पद्मावती देवी हे पुर्वपरंपरा गावातील महत्त्वाचे दैवत असून वैशाखी पौर्णिमेला देवीची यात्रा भरवली जाते.यावेळी दोन ते अडीच हजार बकरी कापली जातात.[4] इ.स. १९८८ साली या देवस्थानाचे ट्रस्ट करण्यात आले.त्याचे पहिले अध्यक्ष श्री. मुरलीधर बागल हे होते.त्यानंतर श्री. नागेश खटकाळे हे अध्यक्ष बनले.[5]

महाराष्ट्रातील विविध ठिकाणच्या देवस्थानांप्रमाणे येथेही देवीची अख्यायीका सांगितली जाते. ही अख्यायीका मौखिक माहिती स्वरूपात मिळाली आहे.अरबी व्यापारी बैलांच्या पाठीवर तांदळाच्या गोण्या घेऊन चालले असताना पिंपळे गावातील तलावाकाठी विसाव्यासाठी थांबले.सध्याच्या मंदिराच्या ठिकाणालगत तलाव होता.व्यापाऱ्यांचा तांडा येथून निघताना एक बैल काही निघेना त्याच्या अंगावरील ओझे कमी केल्यानंतर सुपारीच्या आकाराचा शेंदरी रंगाचा खडा त्याच्या पायाच्या नखातून गळाला.देवीने लोकांना स्वप्नात येऊन सांगितले पण लोकांना जाणिव झाली नाही.गावातील आडाचे पाणी खराब झाल्यानंतर लोकांना तळयालगत झ-यावर पाण्यासाठी जावे लागले.त्यावेळी स्वप्नात आलेला खडा, पाच बांगडया इत्यादी गोष्टी दिसल्या हा चमत्कार पाहुन या ठिकाणी देवीची स्थापना करण्यात आली.ही देवी कोकणस्थ मानली जाते.[6]ही कथा श्री राजेंद्र गुरव यांनी सांगितली.सदर कथेची ऐतिहासिकता शोधाचा भाग आहे पण ही कथा येथे उदधृत करत

LBP PUBLICATION

आहे.याठिकाणाहून कोणताही व्यापारी मार्ग जात असल्याचा काहीएक संदर्भ मिळत नाही. अशा प्रकारच्या कथा महाराष्ट्रातील अनेक देवस्थानांच्या बाबत ऐकविल्या जातात. गुरव कुटुंबीय ५ ते ६ पिढयांपासून देवीचे पुजारी आहेत.[7]पूर्वी या ठिकाणी दगडी मंदिर होते. मंदीर जीर्ण झाल्याने इ.स. १९८९ साली मंदीराचा जिर्णोध्दार करणेस सुरूवात झाली व इ.स. १९९२ साली जिर्णोध्दार पुर्ण झाला.

### शिवपार्वती अलिंगण मूर्ती -



गावात पद्मावती देवालयाच्या दक्षिणेस छोट्या टेकडीवर एक लहानसे महादेव मंदीर आहे. त्या ठिकाणी एक मूर्ती असून ही मूर्ती साधारणत: सातशे ते आठशे वर्ष जूनी असल्याची शक्यता आहे. ही शिव-पार्वतीची मूर्ती असून शिवपार्वती अलिंगण मूर्ती आहे. शिवपार्वतीच्या पायाजवळ शिवाचे वाहन नंदी कोरलेला आहे. मूर्तीच्या उजव्या हाताला खालील बाजूस गणेश तर डाव्या हाताला खालील बाजूस कार्तिकेय कोरलेले आहेत. शिवाच्या उजव्या हातात त्रिशूळ आहे तर डावा हात पार्वतीला अलिंगण दिल्याच्या स्थितीत आहे. शिवाच्या डोक्यावर मुकुट असून गळयात अक्षमाला आहेत. पार्वती शिवाच्या मांडीवर बसल्याचे दिसत आहे. शिव ललितासनावर विराजमानआहे. १८ व्या शतकातील मोडी कागदपत्रांतील उल्लेखानुसार पिंपळेश्वर महादेवाची मूर्ती हीच असावी अशी शक्यता वाटते.

### शिवमूर्ती-



गावातील एका मंदीरात एक शिवमूर्ती असून मूर्ती उभ्या स्थितीत आहे. मूर्तीला चार हात आहेत. मुर्तीच्या वरील बाजूस असलेल्या उजव्या हातात डमरू आहे तर डाव्या हातात त्रिशुल आहे. खालील उजवा हात वरद मुद्रेत तर खालील डावा हात शंख पकडलेला असावा असे दिसते. कमरेला उदरबंध व कटीसूत्र, पायाशी वणमाला तसेच पादवलय आहे. कानात कुंडल, गळयात उपग्रीवा व हिक्कासूत्र आहे. मूर्तीच्या उजव्या पायालगत स्त्रीमुर्ती असून डाव्या पायालगत असलेली रचना झिजल्याने ओळखू येत नाही. मूर्ती पद्मपिठावर विराजमान असावी असे दिसते. मूर्तीच्या शिराच्या मगे तेजोवलय दाखविले आहे.

### लक्ष्मीकेशव मूर्ती –



गावात आजून एक पुरातन मूर्ती असून ती विष्णुमूर्ती असावी आणि तीचे वर्णन लक्षात घेता ती विष्णूच्या लक्ष्मी-केशव रुपाची मूर्ती असावी. मूर्तीला चार हात आहेत. मूर्तीच्या उजव्या हातांचा विचार करता वरील हातात शंख, खालील हातात पद्म आहे. डाव्या हातांचा विचार करता वरील हातात चक्र आहे तर खालील हातात गदा आहे. पायाशी गरुड मानवरूपात हात जोडून गुडघ्यावर बसल्याचे दर्शविले आहे. केशवाच्या डाव्या हाताखाली गदेलगत स्त्री देवतेची मूर्ती आहे. ही लक्ष्मीची मूर्ती असावी. हातात पद्म, शंख, चक्र व गदा ही लांछणे आहेत. मूर्तीच्या डोक्यावर मुकुट असून कानात कुंडले आहेत. गळयात कंठा तसेच हार आहे. कमरेस कटीसूत्र आहे. तसेच पायालगत वणमाला आहे.

### राजकीय तसेच सामाजिक बाबी :

स्वातंत्रप्राप्तीनंतर गावास स्वतंत्र ग्रामपंचायत असून श्री. हरिभाऊधोंडिबा पोटफोडे हे २०१४ साली सरपंच होते.श्री. मुरलिधर हरिभाऊबागल हे सुमारे २० वर्षे सरपंच होते.श्री. पांडुरंग साहेबराव जाधव, श्री अनिल बबनराव बागल, श्री. सोपान लक्ष्मण चोरमले, सौ. जयश्री गणेश खरात हे सरपंच होऊन गेले.[8]

जाधव, बागल, भगत, चोरमले, काटे, पोटफोडे अशी विविध आडनावाची कुटुंबे या गावात राहतात.बागल हे मांगी(पोतरे), ता.करमाळा, जि.सोलापूर येथून येऊन गावात स्थायिक झाले आहेत.[9]मोडी कागदपत्रांतील माहितीनुसार गावात गायकवाड, शेलार, झोल, काटे-पाटील, मत्रे, मुळीक, भगत, कदम, मासाळ, वाणी, डुकरे, पोवार, भोसले या नावांचा संदर्भ येतो.[10]

## आर्थिक बाबी :

इ.स. १६९० व १७२३ सालच्या मोडी कागदपत्रांनुसार गावात एकुण १९२० बिघे अर्थात १६ चावर जमिन होती.[11]सोळा चावर म्हणजे आजचे सुमारे सोळाशे एकर जमीन होय. पुर्वपरंपार शेती ही जिरायत होती.शेतीला बारमाहीपाणपुरवठा नसल्याने गावचीआर्थिक स्थिती बिकट होती. इ.स. १९८० साली कालवा सुरू केला गेला. इ.स. १९७२ साली खडकवासला धरणाचे पाणी कालव्याद्वारे लगतच्या शेटफळगढे गावापर्यंत आले व इ.स. १९९६ पासून प्रत्यक्ष पिंपळे गावास शेतीसाठी कालव्याचेपाणी उपलब्ध होऊलागले.[12]गावाच्या विकासात आर्थिक संस्थांनीही योगदान दिलेले आहे.पद्मावती विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी ही गावातील शेतीला पतपुरवठा करणारी संस्था असून हरिबा बाळको बागल व यशवंत सुभाष ठवरे यांनी या संस्थेची स्थापना केली आहे.मच्छिंद्र देव चोरमले, जगन्नाथ रामचंद्र सुर्यवंशी, नवनाथ मुरलीधर बागल हे चेअरमन होऊन गेले.तर २०१४ साली दत्तात्रय अर्जुन चोरमले हे चेअरमन आहेत.[13]शंकर विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी ही गावात कार्यरत असून श्री. अनिल बबन बागल यांनी या सोसायटीची स्थापना केली आहे.[14]

## जहागिरी व इनाम :

यागावासंदर्भात छत्रपतीशाहु महाराजांच्या काळातील काही उल्लेख मिळतात.छ.शाहु महाराजांनी इंदापुर परगण्यातील गावे विविध व्यक्तींना इनाम दिलेली होती.सरलष्कर निंबाळकर यांना पिंपळे हे गाव मुकासा(जहागीरी) दिलेले होते.तर इ.स. १७२७-२८ च्या एका कागदपत्रानुसार सदर गाव सरलष्कर निंबाळकर यांचेकडून काढून घेऊन पुन्हा खाजगीकडे अर्थात शासनाकडे ताब्यात देण्यात आले.[15]

अशा प्रकारे पिंपळे गावच्या सामाजिक, धार्मिक, ऐतिहासिक बाबींचा आढावा घेता येतो.गावातील आर्थिक विकास प्रक्रिया सिंचन व्यवस्थेशी जोडलेली होती.गावची प्रमुख ओळख म्हणजे पद्मावती देवस्थान हीच होय.त्यामुळे पुणे जिल्ह्याच्या पुर्व भागात हे गाव विशेष ओखळले जाते. सध्या गावचे नाव पद्मावतीचे पिंपळे असे असले तरी मध्ययुगीन कागदपत्रांचा संदर्भ पाहता गावाचे तत्कालिन नाव पिंपळेश्वरावरून पडलेले असावे. त्यातून गावाला किमान ३०० वर्षांचा इतिहास असल्याचे सिद्ध होत आहे.

---

[1]पुणे पुरालेखागार, जमाव दप्तर, पुणे जमाव व रूमाल क्र.७५०.
[2]श्री. मुरलीधर बागल यांची मुलाखत.
[3]पुणे पुरालेखागार, जमाव दप्तर, पुणे जमाव व रूमाल क्र. ७५०.
[4]श्री. मुरलीधर बागल यांची मुलाखत.
[5]श्री राजेंद्र चंद्रकांत गुरव यांची मुलाखत.
[6]उपरोक्त.
[7]उपरोक्त.
[8]श्री. मुरलीधर बागल यांची मुलाखत.
[9]उपरोक्त.
[10]पुणे पुरालेखागार, जमाव दप्तर, पुणे जमाव व रूमाल क्र.७५०.
[11]उपरोक्त.
[12]श्री. भानुदास भगत यांची मुलाखत.

[13]श्री. मुरलीधर बागल यांची मुलाखत.
[14]उपरोक्त.
[15]पुणे पुरालेखागार, शाहु दप्तर, रूमाल क्र. २६, पुडके क्र. २, कागद क्र. ३३३३३ व ३३४८४.

LBP PUBLICATION